**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- ३**

# स भा वृ त्तां त

**दिनांक ०४-५-२०१६** **वेळ-दुपारी ३.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यामा. “क” प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.४/०५/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.शितोळे शैलजा बाबुराव सभापती

२) मा.ननवरे जितेंद्र बाबा

३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

४) मा.भोसले राहूल काशिनाथ

५) मा.पालांडे सुजाता सुनिल

६) मा. सौ. पानसरे अमिना महम्मंद

७) मा.गिता सुशिल मंचरकर

८) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९) मा.सतिश सदाशिव काटे

१०) मा.हमीद नवाब शेख

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु,श्रीमती वंदना - कनिष्ठ अभियंता पापु, श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) नामकरण संदर्भात-मा.राहूल भोसले, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) कमानीच नामकरण करणेबाबत- मा.जितेंद्र ननावरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३)उदयानाचे नामकरण करणेबाबत- मा.जितेंद्र ननावरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) सभेची वेळ बदलणेबाबत- मा.सुषमा तनपुरे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) सांगवी दशक्रिया घाटाजवळील स.नं.८४ मधील उपलब्ध असलेल्या मोकळया जागेबाबत- मा.शैलजा शितोळे, मा.सुषमा तनपुरे,मा.किरण मोटे, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

-------

अ) दिनांक ०२/३/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ६/४/२०१६ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

----------

ठराव क्रमांक- १७१ विषय क्रमांक- १
दिनांक-०४/५/२०१६ विभाग-
सुचक- मा. राहूल भोसले अनुमोदक-मा.शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.राहूल भोसले, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

नेहरुनगर प्रभाग क्र.३८ मध्ये स्मशानभूमी रोडला व शिव शंभो मंगल कार्यालय समोर आपल्या महापालिकेच्या वतीने खेळाचे मैदान विकसित करण्यात आले आहे. सदर खेळाचे मैदान दोन टप्प्यात विकसित करण्यात येत असुन या दोन्ही खेळाच्या मैदानास "मा.महापौर हनुमंतराव भोसले स्पोर्टस् क्लब" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १७२ विषय क्रमांक- २
दिनांक-०४/५/२०१६ विभाग-
सुचक- मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक-मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

महात्मा फुलेनगर मधील पवना इंडस्ट्रिज ईस्टेट शेजारील प्रवेशद्वारास **"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार"** व वायसीएम रोड वरील प्रवेशद्वारास **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रवेशद्वार"** असे नामकरण करणे व त्याबरोबरच दोन्ही प्रवेशद्वारावर समस्त "महात्मा फुले नगर" आपले सहर्ष स्वागत करीत आहे. असा मजकुर टाकणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १७३ विषय क्रमांक- ३
दिनांक-०४/५/२०१६ विभाग-
सुचक- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक-मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३७ मधील मो.जा.क्र. ५० याठिकाणी विकसीत होत असलेल्या उदयानास **"सनी ननावरे उदयान"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १७४ विषय क्रमांक- ४
दिनांक-०४/५/२०१६ विभाग-
सुचक- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक-मा.अमिना पानसरे
संदर्भ- मा.सुषमा तनपुरे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.
क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या** बुधवारी दु. ३.०० वा. ऐवजी सकाळी ११.३० वाजता (**पहिल्या** बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक- १७५ विषय क्रमांक- ५
दिनांक-०४/५/२०१६ विभाग-
सुचक- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक-मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.शैलजा शितोळे, मा.सुषमा तनपुरे,मा.किरण मोटे, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील पवना नदीस लागुन असलेल्या मौजे सांगवी येथील सर्व्हे नं.८४ मधील मोकळी जागा मनपा मार्फत कचरा संकलन केंद्रासाठी वापरली जात आहे. सदर जागेस सिमाभिंत व डांबरीकरणाचे काम मनपा मार्फत करणेत आलेले आहे. सदरची वर्षानुवर्ष मनपातर्फे वापरणेत येणारी मोकळी जागा मनपाकडे देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरीत केल्यास त्या जागेचा वापर मनपा उपयोगासाठी होऊ शकतो. उपरोक्त नमुद जागा जलसंपदा विभागाच्या आवश्यकतेनुसार मनपा मार्फत पूर्ववत परत करणेत येईल.

तरी उपरोक्त नमुद केलेली सांगवी दशक्रीया घाटाजवळील सर्व्हे नं.८४ मधील उपलब्ध असलेल्या मोकळया जागेचा ताबा मनपाकडे देखभाल दुरुस्तीकामी हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

-------

**(मा.सवणे-कार्यकारी अभियंता** बीआरटीएस यांनी सन्मा.सदस्य यांना जागतिक बँकेच्या सहाय्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका SUTP अंतर्गत शहरात बीआरटीएस कॉरीडॉर विकसीत करीत आहे त्या अंतर्गत विविध Technical assistance studies साठी जागतिक बँकेकडून GEF Grant मधुन सल्लागार नेमणेत आले आहेत. त्यापैकी Parking Policy & Master Plan यासाठी UMTC New Delhi यांची सल्लागार म्हणुन महानगरपालिकेमार्फत नेमणुक करण्यात आली आहे.सदर सल्लागारांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध भागांचे सर्वेक्षण व अभ्यास करुन पार्किंग पॉलिसीचा मसुदा तयार केला आहे.सदर पार्किंग् पॉलीसीच्या मसुदयाचे सादरीकरण केले. )

सही/

(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)
सभापती
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/ ७१ /२०१६.
दिनांक- ०५/०५/२०१६.



प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.